महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.१९६/२०२३/जाहिरात दिनांक: ०९ नोव्हेंबर, २०२३

## -: शुध्दीपत्रक :-

**विषय : उप संचालक (माहिती), गट-अ / वरिष्ठ सहायक संचालक (माहिती), जिल्हा माहिती अधिकारी, वरिष्ठ उप संपादक, जनसंपर्क अधिकारी, गट-अ (कनिष्ठ) / सहायक संचालक (माहिती), अधीपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने, माहिती अधिकारी, गट-ब**
**संदर्भ : जाहिरात क्रमांक - ०१२९/२०२२, १३०/२०२२ आणि १३१/२०२२**

शासनाच्या, सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामधील मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उप संचालक (माहिती), गट-अ (जाहिरात क्रमांक १२९/२०२२), वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) / जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ उप संपादक / जनसंपर्क अधिकारी, गट-अ (कनिष्ठ) (जाहिरात क्रमांक १३०/२०२२) आणि सहायक संचालक (माहिती) / अधीपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने / माहिती अधिकारी, गट-ब (जाहिरात क्रमांक १३१/२०२२) या संवर्गांच्या जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तथापि, शासनाच्या, सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ तसेच दिनांक २९ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रांच्या अनुषंगाने प्राप्त अभिप्रायानुसार, जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हतेच्या संदर्भात दिनांक १० एप्रिल, २०२३ आणि दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी समतुल्य पदवी आणि पदव्युत्तर पदवी अर्हतेनुसार शुध्दीपत्रक प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. त्याच अनुषंगाने शासनाच्या दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार, खाली नमूद समतुल्य पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अर्हता ग्राह्य समजण्यात येत आहेत:-

| पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|
| B.A. in Journalism | M.A. In Mass Communication |
| P.G. Diploma in Electronic Media | Master of Journalism |
| P.G. Diploma in Advertising | M.A. of Mass Communication & Journalism |
| P.G. Diploma in Journalism | Master in Journalism & Mass Communicaiton |
| P.G. Diploma in Mass Communication | Master in Journalism & Communicaiton |
| Bachelor of Journalisam (Media Science) | Master of Communicaiton Studies |
| Bachelor of Mass Media (B.A./B.Sc.) | Master of Journalism (Media Science) |
| Bachelor of Media and Communication (B.A./B.Sc.) | M.A./M.Sc. (Electronic Media) |
| B.A. in Journalism & Mass Communicaation | M.Sc. in Communication Media for Children |
| B.Voc. in Journalism & Media Management | M.A. in Media and Communication |
| Bachelor of Arts International Journalism | M.Sc. in Extension and Communication |
| B.A. (Mass Communication and Journalism – 3 Years Degree course) | M.A. / M.Sc. Mass Media |
| B.A. Communicaation & Journalism | Master of Arts Journalism & Communicaation |
| B.A. & Bachelor in Journalism - १ वर्ष पदवी अभ्यासक्रम | M.A. Mass Communication |
| B.A. & Bachelor in Journalism - १ वर्ष पदवी अभ्यासक्रम | P.G. Diploma in Advertising and Media<br>Master of Communication Studies |

**२.** उपरोक्त समतुल्य अर्हता ग्राह्य समजण्यात आल्यामुळे, अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक १२९/२०२२, १३०/२०२२ आणि १३१/२०२२ या जाहिरतींस अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा कालावधी** | **दिनांक १३ नोव्हेंबर, २०२३ रोजी १४.०० ते दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी २३.५९** |

**३.** जाहिरात क्रमांक १२९/२०२२, १३०/२०२२ आणि १३१/०२२ नुसार विहित पध्दतीने अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**४.** मूळ जाहिरातीमधील वयोमर्यादा तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभव कालावधी मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.

**५.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अनुसार दिनांक १ मार्च, २०२० ते दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत वयाधिक ठरणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

६.....

६. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

७. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक १२९/२०२२, १३०/२०२२ आणि १३१/०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.